# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापति बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ मुंबई-४०० ०१३
दुरध्वनी क्र.:०२२-६९३२८१०३/११७ ई-मेल: mlwbwc@gmail.com


जा.क्र.मका/कार्यक्रम/२०२५/ ८९२ दि.३१/०७/२०२५

परिपत्रक

**विषय :- रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार -२०२४**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ही कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सर्वांगीण विकासाकरीता कार्यरत असलेली संपूर्ण देशातील एक अग्रगण्य संस्था आहे.

मंडळाच्या वतीने कामगारांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारी गुणंवत कामगार कल्याण पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार ही अभिनव योजना सुरु आहे. कामगारांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, आदर्श कामगार व उत्तम नागरीक व्हावे, या हेतूने त्यांनी केलेल्या चांगल्या कामाची उदा.उत्पादन क्षमता /कार्यक्षमता या संबंधात व त्याच बरोबर त्यांचे कुंटुंब,समाज व देश याबाबत त्यांची जबाबदारी त्यांनी चांगल्या रितीने पार पाडल्याची दखल घेणे व त्यास प्रोत्साहान देणे या उद्देशाने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात येतो.

सेवाभावी व्यक्ती आणि संस्था समर्पित वृत्तीने कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी व कामगारंचा जिवनस्तर उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्नशिल असतात, त्यांचा गौरव करण्यासाठी मंडळाच्या वतीने **रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार** देण्यात येतो. सदर पुरस्काराकरीता प्रतिवर्षी एक संस्था व एक व्यक्ती यांची निवड केली जाते. पुरस्काराचे स्वरुप **रु. ७५०००/-** (व्यक्ती व संस्था ) स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र असे आहे.

समर्पित वृत्तीने कार्य करणाऱ्या अशा व्यक्ती किंवा संस्थाना पुरस्कारासाठी अर्ज करायला लावणे उचित नसल्याने विविध माध्यमातून त्यांची माहिती एकत्र करण्यात येत आहे. समाजातील सर्व स्तरांवरील मान्यवर व्यक्ती,उद्योग संस्था, कामगार संघटना, गुणवंत कामगार संघटना,मंडळाची राज्यातील केंद्र कार्यालये,वृत्तपत्रांचे संपादक यांच्याकडून माहिती मागविण्यात येत आहे. गुणवत्तेनुसार त्यांचे विश्लेषण करुन निवड केली जाईल.

रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कारासाठी सुयोग्य व्यक्ती व संस्था यांची निवड करण्यासाठी गट कार्यालयाने विभागीय कार्यालयामार्फत कमीत कमी एक व्यक्ती व संस्था यांची माहीती मध्यवर्ती कार्यालास सादर करावी. सदर माहिती ज्या नमुण्यात सादर करावयाची आहे तो नमुना मंडळाच्या www.public.mlwb.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**राज्य पातळीवरील या पुरस्काराकरीता नावे सुचविताना खालील बाबींची नोंद घेण्यात यावी.**

**पुरस्काराकरीता निकष : - (व्यक्ती)**

१ व्यक्तीकरीता पुरस्काराचे नाव सुविलेल्या मान्यवरांचे वय ५० वर्षाहून कमी नसावे.

२ सदर मान्यवर व्यक्तिने कामगार क्षेत्रात किमान २५ वर्ष उल्लेखनिय कार्य केलेले असावे.

३ कामगारंच्या प्रश्नांना वाचा फोडणे,ते तडीस नेणे, कामगारांमध्ये कुटुंब नियोजनाची जाणीव निर्माण करणे, एडस् जनजागृत्ती, प्रौढ साक्षरता, अंधश्रध्दा निर्मुलन, स्त्री -पुरुष समतेची प्रस्थापना, सहकारी गृहनिर्माण संस्था उभारुन कामगारांना घरे मिळवून देणे, कामगारांच्या मुलांसाठी शाळा ,अभ्यासिका उघडणे,पर्यावरण व वृक्ष संवर्धन, स्वच्छ भारत अभियान, बेटी बचाव बेटी पढाव आदी कार्यामध्ये भरीव स्वरुपाचे कल्याणकारी कार्य प्रत्यक्ष हाती घेणे आणि लेखनाद्वारे कृतीशिलपणे योगदान देणे यात अग्रेसर व्यक्तींची नावे पुरस्काराकरीता सुचवावीत.

४ लोकशाही जाणीवांचा विकास, राष्ट्रीय एकात्मता, महिला,अपंग कामगार/ मागासवर्गीय अशा समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी संवैधनिक मार्गाने कार्य करणाऱ्या व्यक्ती/संस्था यांचाच विचार पुरस्कारासाठी केला जाईल.

Scanned with OKEN Scanner

५ राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणनाऱ्या जातीयवादी तसेच संकुचित विचारच्या घटना विरोधी वर्तन असणाऱ्या व्यक्तींचा विचार या पुरस्काकरीता करता येणार नाही.

**पुरस्काराकरीता निकष :- (संस्था)**

१ पुरस्काराकरीता ज्या संस्थेचे आस्थपनेंसह नाव सुचविण्यात येईल ती नोंदणीकृत असावी.

२ संस्थेची नोदंणी किमान २५ वर्षापूर्वी असावी.

३ कामगारांच्या सर्वांगीण सामाजिक अभिवृध्दीसाठी म्हणजेच कामगारांना कुटूंब नियोजनाची जाणीव निर्माण करणे, प्रौढ शिक्षण व्यसनमुक्ती इ. त्याचप्रमाणे कामगारांसाठी सुरक्षितता,आरोग्य विषयक कार्य,कामगारांसाठी गृहसंकुल योजना,कामगारांच्या पाल्यासाठी शैक्षणिक योजना व उपक्रम,पर्यावरण व वृक्ष संवर्धन, स्वच्छ भारत अभियान, बेटी बचाव बेटी पढाव, कामगार कुटुंबीयांसाठी करमणूक केंद्राच्या सोयी सुविधा, युवक व महिलांसाठी रोजगा/स्वंयरोजगार विषयक कार्य,एड्स जनजागृती, अंधश्रध्दा निर्मूलन,साक्षरता अभियान,तसेच कामगार व त्याच्या कुटूंबीयांकरीता राबविण्यात येणारे अन्य कल्याणकारी उपक्रम.

४ कामगारांच्या कार्यकुशलतेत वाढ व्हावी याकरीता राबविण्यात येणारी कार्यशाळा.

५ सामाजिक,सांस्कृतिक,क्रिडा,साहित्यिक विषयक कायक्रमाचे आयोजन.

६ राष्ट्रीय एकात्मकता अपंग कामगार/मागासवर्गीय,दुर्बल आणि वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी केलेले उल्लेखनिय कार्य.

७ नैसर्गिक आपत्ती जसे की,महामारी (जसे कोविड-१९) महापुर,चक्रीवादळ यापासून नागरिकांना वाचविण्यासाठी रेस्क्यु ऑपरेशन, आर्थिक व अन्य प्रकारे केलेले विशेष प्रयत्न आदी कार्य.

८ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अधिनियम १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधी भरणा केलेला असावा.

उपरोक्त पुरस्काराकरीता **२० ऑगस्ट २०२५** पर्यंत माहीती सादर करावी.

कल्याण आयुक्त

सोबत:- माहीती सादर करण्याचा नमुना
(व्यक्तीकरीता/संस्थेकरीता)

प्रत:

१ ) उप कल्याण आयुक्त (लेखा व लेखा परीक्षा/कार्यक्रम/प्रशासन ) म.का.मुंबई
२ ) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी,म.का.मुंबई●●
३ ) कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक,म.का.मुंबई
४) सर्व विभाग प्रमुख,वि.का.मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/छ.संभाजीनगर/अकोला/नागपुर.
५)कामगार विकास अधिकारी,का,क्रि.भवन,मुंबई/नागपुर/पुणे
६) सर्व कामगार कल्याण अधिकारी (१९ गट कार्यालये) ●●●
७) सर्व केंद्र प्रमुख....

●● यांनी वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्दी करण्यासाठी कार्यवाही करावी.
●●● यांनी सदरचे परिपत्रक केंद्रप्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार
# (व्यक्तीकरिता)

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारचे नाव<br>(आडनाव प्रथम) | |
| २ | पत्ता<br>अ)कायमचा पत्ता | |
| | ब) पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | जन्मतारीख | |
| ४ | शिक्षण | |
| ५ | वय (उमेदवारचे वय ५० वर्षापेक्षा कमी नसावे.) | |
| ६ | आधारकार्ड क्रमांक | |
| ७ | कौटुंबिक माहिती | |

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यांची नावे | वय | अर्जदारशी नाते | व्यवसाय |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

कार्याचा आढावा

| | | |
|---|---|---|
| ८ | कामगार कार्याच्या सेवेची प्रेरणा कशी निर्माण झाली व कामगार सेवेची सुरुवात कुठे, केव्हा व कशाप्रकारे सुरू केली. (आठवणींनुसार ठिकाण, वर्ग, इत्यादि बाबींचा तपशिल पूर्ण लिहावा.) | |
| ९ | कामगार क्षेत्रात किती वर्ष कार्य केलेले आहे. (कामगार क्षेत्रात कमीत कमी २५ वर्षे कार्य असावे.) | |
| १० | कार्याची व्याप्ती (राज्य/जिल्हा/तालुका) | |
| ११ | कामगारांकरिता कोणते उल्लेखनिय काम केले (शासकीय योजनांच्या लाभा व्यतिरिक्त इतर कामाचा तपशिल द्यावा.) | |
| १२ | उमेदवाराने कामगार क्षेत्रात कार्यास सुरुवात केली त्यावेळी कार्याचे स्वरूप कसे होते. | |

Scanned with OKEN Scanner

<table>
<tr><td>१३</td><td colspan="3">कार्य सुरू केल्यानंतर कार्याची व्यापकता कशाप्रकारे वाढविण्यात आली.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१४</td><td colspan="3">कामगार क्षेत्रात काम करताना कोणत्या अडचणी आल्या.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१५</td><td colspan="3">त्या अडचणीतून मार्ग कसे काढले त्याचा अंगीकृत कार्यास कसा फायदा झाला.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१६</td><td colspan="3">केलेल्या कार्यामुळे कामगारांची प्रगती कशी झाली व कितपत फायदा झाला.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१७</td><td colspan="3">कामगारांचा विकास घडविण्यासाठी महत्वपूर्ण कार्य असल्यास उदाहरणासह तपशिल द्यावा.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१८</td><td colspan="3">पर्यावरण व वृक्ष संवर्धन याबाबतचे कार्य उदाहरणासह तपशिल द्यावा.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१९</td><td colspan="3">स्वच्छ भारत अभियान व बेटी बचाव- बेटी पढाव याबाबतचे कार्य उदाहरणासह तपशिल द्यावा.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२०</td><td colspan="3">लोकशाही जीवन जाणिवांचा विकास, राष्ट्रीय एकात्मता, महिला अपंग कामगार, मागासवर्गीय,अशा समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी संवैधानिक मार्गाने कामाचा तपशिल.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२१</td><td colspan="3">ज्या विविध संस्थे/संघटनेमार्फत कार्य केले आहे त्याबाबत थोडक्यात माहिती द्यावी.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="3">२२</td><td colspan="3">शासकीय/निमशासकीय सेवेत आहे/होते काय ? असल्यास</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>कार्यालयाचे/संस्थेचे नाव</td><td>पदनाम</td><td>पासून</td><td>पर्यंत</td><td>शेरा</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२३</td><td colspan="3">यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा किंवा केंद्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे का ? असल्यास पुरस्कार व त्याचे नाव</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२४</td><td colspan="3">महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने देऊ केलेला रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार स्विकारण्यास संमती आहे काय ?</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२५</td><td colspan="3">या व्यतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास नोंद करावी.</td><td colspan="3"></td></tr>
</table>

ठिकाण :-

दिनांक :-

माहिती भरणाऱ्या उमेदवारचे
नाव, स्वाक्षरी व हुद्दा

अर्जसोबत जोडलेल्या कागदपत्रांची संख्या व यादी

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार
## (संस्थेकरिता)

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे/आस्थापनेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | संस्थेची / आस्थापनेची स्थापना | |
| ४ | कामगार / कर्मचारी संख्या | |
| | कार्याचा आढावा | |
| ५ | कामगार क्षेत्रात किती वर्ष कार्य केलेले आहे. (कामगार क्षेत्रात कमीत कमी २५ वर्षे कार्य असावे.) | |
| ६ | कार्याची व्याप्ती (राज्य/जिल्हा/तालुका) | |
| ७ | कामगारांकरिता कोणते उल्लेखनिय काम केले (शासकीय योजनांच्या लाभा व्यतिरिक्त इतर कामाचा तपशिल द्यावा.) | |
| ८ | कामगार व व्यवस्थापन यांच्यामधील करार | |
| ९ | संस्थेकडुन / कंपनीकडून दिले जाणारे भत्ते | |
| १० | संस्थेमध्ये / कंपनीमध्ये पुरुष आणि स्त्रिया यांना समान वागणूक दिली जाते का ? | |
| ११ | सामाजिक कार्यात सहभाग | |
| १२ | कामगार / कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोई - सुविधा | |
| १३ | केलेल्या कार्यामुळे कामगारांची प्रगती कशी झाली व कितपत फायदा झाला. | |
| १४ | कामगारांचा विकास घडविण्यासाठी महत्वपूर्ण कार्य असल्यास उदाहरणासह तपशिल द्यावा. | |
| १५ | पर्यावरण व वृक्ष संवर्धन याबाबतचे कार्य उदाहरणासह तपशिल द्यावा. | |
| १६ | स्वच्छ भारत अभियान व बेटी बचाव- बेटी पढाव याबाबतचे कार्य उदाहरणासह तपशिल द्यावा. | |
| १७ | कामगारांच्या सर्वांगिण सामाजिक अभिवृद्धीसाठी कार्य व कामगार व कामगार कुटुंबियांकरिता राबविण्यात येणारे अन्य कल्याणकारी उपक्रम | |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १८ | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधीची वर्गणी भरतात का ? असल्यास आस्थापना कोड क्रमांक | |
| १९ | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कार्यक्रमात सहभाग | |
| २० | यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा किंवा केंद्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे का ? असल्यास पुरस्कार व त्याचे नाव | |
| २२ | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने देऊ केलेला रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार स्विकारण्यास संमती आहे काय ? | |
| २३ | या व्यतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास नोंद करावी. | |

ठिकाण :-

दिनांक :-

माहिती भरणाऱ्या अधिकाऱ्याची
स्वाक्षरी, नाव व हुद्दा

अर्जसोबत जोडलेल्या कागदपत्रांची संख्या व यादी

Scanned with OKEN Scanner